Page :
Date : / /

॥श्री॥

# अभिनय

लेखक - शरदचंद्र गोविंद लिमये

॥नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम् ॥

जगामध्ये अनेक प्रकारच्या कला आहेत. साधारणपणे आपण ६४ कलांचा विचार करतो. त्यामध्ये मुख्यत्वे करुन नाटक, संगीत व नृत्य ह्या कला मराठी रसिकांच्या मनाला मोहिनी घालतात. चित्रकला, चित्रपट, शिल्पकृती, सुतारकाम, लोहकर्म, क्रिडा, शिलाई अशासारख्या कलाही व्यावसायीक पातळीवर आपली स्थाने टिकून आहेत. परंतु "नाटक" ही अशी एकच कला आहे की जी भिन्न भिन्न आवड असलेल्या सर्व सामान्य व्यक्तीचे समाधान करू शकते.

नाटक आणि चित्रपट यामध्ये एकच समान बाब आहे ती म्हणजे "अभिनय." बाकी दोन्ही कलांची तंत्रे भिन्न आहेत. दोन्ही कलांचा आत्मा एकच आहे तो म्हणजे "अभिनय" मात्र त्याचे सादरीकरणाची प्रक्रिया भिन्न आहे. "अभिनय" हा नाटकाचा "आत्मा" आहे. चित्रपटातला अभिनय एकदा कॅमेऱ्यामध्ये कैद झाला की त्यात बदल करता येत नाही. त्यामुळे दृश्य चित्रीकरण करताना "टेक-रिटेक" करावे लागतात. रंगमंचावर नाटक सादर करताना तो अभिनय "जिवंत" अभिनय असतो. त्याला असा "टेक-रिटेक्स" नसतात.

लेखकाची संकल्पना-कथा नाटक स्वरूपाने रंगमंचावर अवतरते ती कथा-ते नाटक कलाकाराच्या माध्यमातून प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य म्हणजे "अभिनय." अनेक कलाकार एकत्र येऊन लेखकाची कथा समूह सूत्राने रंगमंचावर दर्शविली जाते ते नाटक.

विशिष्ट संहितेतील वेगवेगळ्या व्यक्तीरेखा एकाच कलाकाराने सादर केलेल्या प्रयोगाला "एकपात्री अभिनय" असे संबोधले जाते. नकलाकार हाही अभिनयच करतो पण तो विशीष्ट नामवंत व्यक्तीची नक्कल करतो.

रंगमंचावरील कलाकार चार प्रकारच्या अभिनयाने ते नाटक प्रेक्षकापर्यंत पोचवण्याचे काम करतो. आंगिक, वाचिक, सात्विक आणि आहार्य हे ते चार प्रकार आहेत.

– पान २वर

संवादाच्या व पात्रांच्या कृतीतला आशय अंगाच्या हालचालींद्वारा विशिष्ट मर्यादेते व्यक्त करणे तो "आंगिक अभिनय". नाटकातील गद्य-पद्यात्मक संवाद वाचेचा उपयोग करुन सादर करणे हा "वाचिक अभिनय". नाटकातील पात्रांनी आपल्या भावना, मानसिकता आपल्या चेहऱ्यावरील हावभावाद्वारे व्यक्त करणे याला "सात्विक अभिनय" म्हटले जाते. हे तीनही अभिनय एकवटून सादर करतांना त्यावेळी वातावरण निर्मितीची गरज असते. त्या विशिष्ट वातावरणाची जाणीव प्रकाशयोजना व पार्श्वसंगीत या माध्यमातून प्रेक्षकांना करून देण्याच्या क्रियेला "आहार्य अभिनय" म्हणतात.

"आयुर्नुरुपः प्रथम वस्तु वेषः। वेषानुरूपेण गतिप्रचारः।
गति प्रचारानुगतम् च पाठ्यम्। पाठ्यानुरूपाभिनयश्च कार्यः॥

सर्व प्रथम नाट्यकृतीतील पात्राचे वय, स्वभाव याला साजेशी वेशभूषा - त्यानंतर योग्य अशा हालचाली, आवाज, वाणी अनुरूप असाव्यात. त्या माध्यमातून पात्रांचा अभिनय झाला पाहिजे. कलाकारांने स्वतःचे अस्तित्व विसरून पात्राच्या रुपात वावरले पाहिजे. त्याला "परकाया प्रवेश" म्हणतात. लेखकाने देहाविना पात्र निर्माण केलेले असते. कलाकाराने त्यात आत्मा भरायचा असतो. त्या पात्राला जिवंत करण्यासाठी कसदार अभिनयाची गरज असते. लेखकाने निर्माण केलेल्या पात्राची ठेवण, वय, स्वभाव, वेशभूषा याचा अभ्यास कलाकाराने करावयाचा असतो. व्यक्तीरेखा साकारतांना त्याला पोषक हालचाली, शब्दोच्चार याबाबत दिग्दर्शकाच्या सूचनेचे पालन करावयाचे असते. यासाठी रोजच्या रोज सराव तालमीसाठी हजर राहण्याची आवश्यकता असते.

लेखकाचे शब्द प्रेक्षकापर्यंत पोहोचवण्यासाठी कलाकाराला "बीईंग, फिलींग व डुईंग" अशा तीन अवस्थामधून जावे लागते. संहिता पाठ असणे ही कलाकाराची पहिली जबाबदारी असते. लेखकाने पात्रांच्या हालचालीबद्दलच्या सूचना संहितेतील संवादासोबत दिलेल्या असतात. त्याला "ब्रॅकेट ड्रापा" म्हणतात. प्रसंगानुसार अशा हालचाली करणे लेखकाला अभिप्रेत असतात. निरर्थक हालचाली आणि "ॲडीशन्स" समोरच्या कलाकारांला अडचणीत आणू शकतात. याचा कलाकारांनी मोह टाळावा. लेखकाला अभिप्रेत हालचाली रोजच्या सराव तालमीतच नक्की होतात.

स्टेज बिझीनेस हा कलाकारांचा महत्वाचा टप्पा आहे. रंगमंचावरील - साहित्याचा वेळेवर व योग्य पध्दतीने वापर केला जावा अशी अपेक्षा असते. कारण या "स्टेज बिझीनेस" मध्ये समोरच्या कलाकाराच्या हालचाली, संवाद, अभिनय

- उवरे



27

अवलंबून असतो. अशा हालचाली वेळेवर व प्रसंगानुरूप घडल्या नाही तर या नाटकाची भट्टीच बिघडते आणि ऐनवेळी प्रयोगात गोंधळ होतो.

रंगभूषा, वेशभूषा, दिग्दर्शन, प्रकाश योजना, पार्श्वसंगीत नेपथ्य. अशा विविध विभागाच्या सांघीक समन्वयांतून ही "अभिनय" कला रंजक होते. विविध विभाग आणी कलाकार यांच्या अभिनयाद्वारे ही नाट्यनिर्मिती होते.

नाटकामध्ये भूमिका कोणचीही असो, रोल लहान असो वा मोठा. अनेक दिवस तालमी केल्यानंतर प्रत्येक्ष प्रयोगाच्या वेळी रंगमंचावर हा कलाकार "राजा" असतो.

भरतमुनींनी निर्माण केलेल्या नाट्यशास्त्रा मध्ये कालानुरूप बदल झाले आहेत. नवी नवी तंत्रे येत आहेत, सुधारणा होत आहेत. समीकरणं बदलत आहेत. सादरीकरणाच्या पध्दती बदलतं आहेत. सर्व आव्हानांचा स्वीकार करून रंगभूमीची वाटचाल करतांना "अभिनय" हा आत्मा अमर आहे हे विसरून चालणार नाही.

—o—



लेखक: शरदचंद्र गोविंद लिमये
शांतीवन
१७२ मंगळवार पेठ
सातारा ४१५ ००२
९४२२६०५४८२


28